महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्र.संवैशिवसं/तांत्रिक-अतांत्रिक/जाहिरात/आस्था-४/८५३ /२५ दिनांक : १८ /०६/२०२५

**जाहिरात**
**आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष**
**सरळसेवा भरती**
**स्पर्धा परीक्षा -२०२५**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय व वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालय व सलंग्नित रुग्णालयातील **गट-क तांत्रिक/अतांत्रिक** संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याकरिता स्पर्धापरीक्षेसाठी अर्हताप्राप्त उमदेवारांकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सरळसेवा भरती प्रक्रियेशी संबधित ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची सुविधा वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांच्या www.med-edu.in या अधिकृत संकेतस्थळावर गुरुवार दि.१९.०६.२०२५ पासून स्पर्धा परीक्षा-२०२५ या मथळयाखाली उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचून केवळ ऑनलाईन अर्ज सादर करावेत. फक्त ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज व ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेले परीक्षाशुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज/परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व कार्यक्रम, वेळापत्रक, वेळापत्रकातील बदल इत्यादी सूचना कार्यालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. सदर भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांशी कोणताही स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्यात येणार नसून, सदर संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या सूचनांची दखल घेवून त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी. कोणत्याही वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहिरात तसेच कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणारी जाहिरात यामध्ये तफावत विसंगती आढळून आल्यास कार्यालयाच्या संकेतस्थळावरील जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १९.०६.२०२५ रोजी गुरुवार सायंकाळी ०५.०० पासून |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १९ जून २०२५ ते दिनांक ०९ जुलै, २०२५ सायंकाळी ११.५५ वाजेपर्यंत |

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| ३ | ऑनलाईन पध्दतीने स्पर्धा परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०९ जुलै, २०२५ सायंकाळी ११.५५ वाजेपर्यंत |
| ४ | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. |
| ५ | जाहिरातीमधील बाबींसंबंधी निवेदने सादर करण्यासाठी ई-मेलआयडी | dmercot2025@gmail.com |
| ६ | हेल्पलाईन नंबर | ०२२- ६१०८७५१८ |

उक्त भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, सामाजिक आरक्षणामध्ये संवर्गनिहाय/पदनिहाय बदल करण्याचे, सरळसेवा भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे /नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखुन ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम राहील. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांना राहतील. त्याबाबत उमेदवारांना कोणताही हक्क/दावा सांगता येणार नाही.

**स्पर्धा परीक्षा-२०२५**

**(गट-क तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील पदे)**

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| **अ)** | **तांत्रिक संवर्ग पदे** | | |
| **१** | ग्रंथपाल | ५ | **एस-१४: ३८६०० - १२२८००** |
| **२** | आहारतज्ञ | १८ | **एस-१४: ३८६०० - १२२८००** |
| **३** | समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) | १३५ | **एस-१४: ३८६०० - १२२८००** |
| **४** | भौतिकोपचार तज्ञ | १७ | **एस-१४: ३८६०० - १२२८००** |
| **५** | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १८१ | **एस-१३: ३५४०० - ११२४००** |
| **६** | ई.सी.जी. तंत्रज्ञ | ८४ | **एस-१३: ३५४०० - ११२४००** |
| **७** | क्ष किरण तंत्रज्ञ | ९४ | **एस-१३: ३५४०० - ११२४००** |
| **८** | सहायक ग्रंथपाल | १७ | **एस-१० २९२०० - ९२३००** |
| **९** | औषधनिर्माता | २०७ | **एस-१० २९२०० - ९२३००** |
| **१०** | दंत तंत्रज्ञ | ९ | **एस-१० २९२०० - ९२३००** |
| **११** | प्रयोगशाळा सहायक | १७० | **एस-७ २१७००- ६९१००** |
| **१२** | क्ष किरण सहायक | ३५ | **एस-७ २१७००- ६९१००** |
| **१३** | ग्रंथालय सहायक | १३ | **एस-०६ १९९०० - ६३२००** |
| **१४** | प्रलेखाकार /ग्रंथसुचीकार डॉक्युमेंटालिस्ट/कॅटलॉगर | ३६ | **एस-०६ १९९०० - ६३२००** |
| **१५** | वाहन चालक | ३७ | **एस-०६ १९९०० - ६३२००** |
| | **एकूण (अ)** | **१०५८** | |

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| ब) | अतांत्रिक संवर्ग (मुंबई बाहेरील पदे) | | |
| १६ | उच्च श्रेणी लघुलेखक | १२ | एस -१६ ४४९०० -१४२४०० |
| १७ | निम्नश्रेणी लघुलेखक | ३७ | एस -१५ ४१८०० - १३२३०० |
| | एकूण (ब) | ४९ | |
| | एकूण (अ) + (ब) | ११०७ | |

२. शैक्षणिक अर्हता :-

जाहिरातीमध्ये नमूद पदांकरीता अर्ज करण्यासाठी दि.०९.०७.२०२५ रोजी सेवाप्रवेश नियमांनुसार पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव पुर्णत: धारण करणे अनिवार्य आहे.

(Technical Cadre)

| No. | पदाचे नांव<br>Name of the Post | पद भरतीचे नियम / शैक्षणिक पात्रता<br>Recruitment Rule / Education Qualification |
|---|---|---|
| | | तांत्रिक पदे |
| १ | प्रयोगशाळा सहायक<br>Laboratory Assistant | १) Bachelor of Paramedical Technology in Laboratory or B. Sc.in Paramedical Technology in Laboratory<br>Or<br>Bachelor of Science with Physics and Chemistry or Biology and a Diploma or Certificate in Laboratory<br>२) Have valid registration as per Maharashtra Paramedical Council Act, २०११<br>३) Preference shall be given to candidates having minimum one year experience as Laboratory Asst. in Government recognised hospitals |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ<br>Laboratory Technician | १) Bachelor of Paramedical Technology in Laboratory or B. Sc.in Paramedical Technology in Laboratory<br>Or<br>Bachelor of Science with Physics and Chemistry or Biology and a Diploma or Certificate in Laboratory<br>२) Have valid registration as per Maharashtra Paramedical Council Act, २०११<br>३) Preference shall be given to candidates having minimum one year experience as Laboratory Technician. in Government recognized hospitals |
| | | टिप :- प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहायक या पदाकरीता Bachelor of Science व Diploma or Certificate in Laboratory ग्राह्य धरण्यात येईल. |
| ३ | ग्रंथपाल<br>Librarian | १) Post Graduate degree in Arts, Commerce or Science.<br>२) Preferably M.sc with Biology or Zoology<br>३) In addition, possess Degree in Library Science from Statutory University. |
| ४ | ग्रंथालय सहायक<br>Library Assistant | Have passed S.S.C examination of Maharashtra Secondary and Higher Secondary Examination Board Pune or Equivalent examination recognised by Govt. plus a certificate course of 6 months duration on Library Science of a recognised Institute |

| No. | पदाचे नांव<br>Name of the Post | पद भरतीचे नियम / शैक्षणिक पात्रता<br>Recruitment Rule / Education Qualification |
|---|---|---|
| ५ | सहायक ग्रंथपाल<br>Assistant Librarian | Posses a degree in Art, Science or Commerce of a Statutory University. Preferably B.sc in biology or zoology plus a diploma or certificate course of 6 months duration in library science of a recognised institute. |
| ६ | ई.सी.जी. तंत्रज्ञ<br>Electrocardiography Technician | १) B. Sc of Paramedical Technology in Cardiology or Bachelor of Science in Paramedical Technology in Cardiology<br>OR<br>B. Sc of Science with physics, and Chemistry or Biology and a diploma or certificate in Cardiology<br>२) Have valid registration as per Maharashtra Paramedical Council Act, २०११<br>३) Provided that, the preference shall be given to candidates having minimum one year experience as Electrocardiography (ECG) Technician in Government recognized hospitals.<br>२) टिप: - ईसीजी तंत्रज्ञ या पदाकरीता Bachelor of Science व a diploma or certificate in Cardiology ग्राह्य धरण्यात येईल. |
| ७ | आहारतज्ञ<br>Dietician | १) BSc (Home Science) Degree from a recognized university.<br>२) Degree equivalent to BSc (Home Science) will not be considered. |
| ८ | औषधनिर्माता<br>Pharmacist | १) Have passed H.S.C or any other equivalent examination recognised by Govt.<br>AND<br>२) Possess a Diploma or degree in Pharmacy from recognized University or institute Statutory University or a Diploma in Pharmacy of a State Govt.<br>AND<br>३) Have valid registration under the Pharmacy ACT 1948. |
| ९ | प्रलेखाकार /ग्रंथसुचीकार (डॉक्युमेंटालिस्ट/ कॅटलॉगर) | Have passed S.S.C examination of Maharashtra Secondary and Higher Secondary Examination Board Pune or Equivalent examination recognised by Govt. plus a certificate course of 6 months duration on Library Science of a recognised Institute |
| १० | समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय)<br>Social Service Superintendent (Medical) | Full-time Postgraduate degree in Social Work (MSW) with fieldwork from a recognized university or Postgraduate degree in Social Work (MSW) with fieldwork from an open or distance university recognized by the University Grants Commission. |
| ११ | क्ष-किरण तंत्रज्ञ<br>X-Ray Technician | १) Possess a degree of Bachelor of Paramedical Technology in Radiography or B. Sc.in Paramedical Technology in Radiography.<br>Or<br>Possess of B.Sc. with Physics and Chemistry or Biology and a diploma or certificate in Radiography.<br>२) Preference shall be given to candidates having minimum one year experience as X-Ray Technician in Government recognized hospitals.<br>३) Have valid registration as per Maharashtra Paramedical Council Act, २०११ |

| No. | पदाचे नांव Name of the Post | पद भरतीचे नियम / शैक्षणिक पात्रता Recruitment Rule / Education Qualification |
|---|---|---|
| १२ | क्ष-किरण सहायक / X-Ray Assistant | १) Degree of Bachelor of Paramedical Technology in Radiography or B.Sc. in Paramedical Technology in Radiography<br>Or<br>B.Sc. with Physics and Chemistry or Biology and a diploma or certificate in Radiography<br>२) Preference shall be given to candidates having minimum one year experience as X-ray Asst. or Darkroom Asst. in Government recognized hospitals<br>३) Have valid registration as per Maharashtra Paramedical Council Act, २०११ |
| १३ | भौतिकोपचार तज्ञ Physiotherapist | १) Have passed Higher Secondary School Certificate Examination with Science Subject<br>AND<br>२) Have passed Bachelor of Physiotherapy from a statutory University.<br>३) Have valid registration from Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy Act २००२. |
| १४ | दंत तंत्रज्ञ Dental Technician | १) Have passed the Higher secondary certificate (HSC) examination.<br>And<br>२) Have passed Dental Mechanical Course recognized by DCI<br>AND<br>३) Have valid registration from Maharashtra State Dental Council under Dentist Act, १९४८ |
| १५ | वाहन चालक | १) should be not more than thirty-eight years of age:<br>२) should be possess a driving licence to drive a light motor vehicle or medium passenger motor vehicle or heavy passenger motor vehicle under the Motor Vehicles Act, १९८८ (५९ of १९८८), issued by the Competent Licensing Authority;<br>३) should be have passed Secondary School Certificate Examination from the recognized school;<br>४) should be possess not less than three years experience of driving a light motor vehicle or medium passenger motor vehicle or heavy passenger motor vehicles in government, semi government or private institutions;<br>५) should be possess basic knowledge of repairing the motor vehicle and possess good health;<br>६) have a clean record of driving motor vehicle and possess good health<br>Note: - Clean record of diriving vehicle includes the following points<br>A. He shall not have been held guilty for the offence of driving under influence of drugs or alcohol or any cognizable offence under the Motor Vehicle Act, १९८८ (५९ of १९८८)<br>B. There shall not be any accident registered against the driver.<br>७) have complete knowledge of topography of the concerned area; and<br>८) can read and speak Marathi, Hindi languages and can read English language. |

| अतांत्रिक पदे | | |
|---|---|---|
| १६ | उच्च श्रेणी लघुलेखक | १) S.S.C./equivalent Examination<br>AND<br>२) Short hand Speed १२० wpm required<br>AND<br>३) Typing English -४० wpm or Marathi - ३० wpm |
| १७ | निम्नश्रेणी लघुलेखक | १. S.S.C./equivalent Examination<br>AND<br>२. Short hand Speed १०० wpm required<br>AND<br>३. Typing English -४० wpm or Marathi - ३० wpm |

टिप :- गट-क तांत्रिक संवर्गातील प्रयोगशाळा सहायक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण सहायक, क्ष-किरण तंत्रज्ञ, ई.सी.जी. तंत्रज्ञ या पदाकरीता Maharashtra Paramedical Council Act, २०११ नुसार नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच भौतिकोपचार तज्ञ, दंत तंत्रज्ञ व औषध निर्माता या पदाकरीता त्या-त्या परिषदांचे कायद्यानुसार नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

**३. वयोमर्यादा :-**

**वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक**

| अ.क्र | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | खुल्या प्रवर्गासाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. ४०४/कार्या-१२/दिनांक २५ एप्रिल २०१६ मधील तरतुदीनुसार **१८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.** |
| २ | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. ४०४/कार्या-१२/दिनांक २५ एप्रिल २०१६ मधील तरतुदीनुसार **१८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.** तथापि वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, वि.मा.प्र., इ.मा.व आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) या सामाजिक प्रवर्गातील **जे उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) गटामध्ये मोडतात अशा उमेदवारांना ही सवलत लागू राहणार नाही.** |
| ३ | पदवीधारक अशंकालीन उमेदवारांसाठी | सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे दरमाह मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीधारक अंशाकालीन उमेदवारांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अशंका -१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, २ जानेवारी २०१९ मधील तरतूदीनुसार **कमाल वयोमर्यादा वय ५५ इतकी राहील.** |
| ४ | स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, सन १९९१ ची | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक निवक १०१०/प्रक्र-०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार |

| अ.क्र | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| | जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतर निवडणूक कर्मचारी | **कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष** इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांना देखील उच्चतम वयोमर्यादा **वय वर्षे ४५** इतकी **राहील.** |
| ५ | खेळाडू उमेदवारांसाठी | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक रा.क्रि.धो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२/दिनांक.०१/०७/२०१६ व तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या विहित वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात येईल. तथापि**उच्चतम वयोमर्यादा वय वर्षे ४३ इतकी राहील**. सदर घटकातील **मागासवर्गीय कर्मचारी यांना देखील उच्चतम वयोमर्यादा वय वर्षे ४३ इ**तकी राहील. |
| ६ | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक शासन निर्णय दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दि.२९/०५/२०१९ मधील तरतूदी नुसार **सरसकट उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.** |
| ७ | प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१००६/मुस-३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.०३/०२/२००७ मधील तरतूदीनुसार कमाल **वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील**. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने, **मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांना देखील कमाल वयोमर्यादा वय वर्ष ४५ इतकी राहील.** |
| ८ | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवारांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही **सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील तसेच दिव्यांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील**. |
| ९ | अनाथ | **वयोमर्यादा- १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.** |

**४. ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप :-**

i. संगणक आधारीत परीक्षेव्दारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणा-या ऑनलाईन परीक्षा प्रश्नपत्रिका हया मराठी व इंग्रजी भाषेमध्ये वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाच्या घेण्यात येतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास ०२ गुण ठेवण्यात आलेले आहेत.

ii. ज्या पदांसाठी शारीरीक व व्यावसायिक चाचणी घेण्याची आवश्यकता नाही, अशा पदांकरीता उमेदवारांची निवड करतांना संगणक अधारीत (Computer Based test) घेण्यात येणारी ऑनलाईन परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी व संबंधित पदाच्या विषयांवरील १०० प्रश्नांकरीता एकूण२०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का,१३-अ, दि.०४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार गणुवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.

iii. ज्या पदांसाठी व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक आहे, अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौधिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ३० गुण ठेवून एकूण १२०

गुणांची (एकूण ६० प्रश्न) परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. तथापि, जे उमेदवार परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील, अशा उमेदवारांनाच व्यावसायिक चाचणी देता येईल. परीक्षा व व्यावसायिक चाचणी यांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

iv. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. क्र.प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का,१३-अ, दि.०४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार जाहिरातीमधील नमूद पदांकरीता मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाहीत.

v. उमेदवारांची निवडसूची तयार करण्यासाठी तसेच ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम हा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का,१३-अ, दि.०४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

vi. स्पर्धा परीक्षा ही ऑनलाईन Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वंतत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून ज्या पदांच्या एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत अशा विविध सत्रातील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठिण्य पातळी तपासण्यांत येवून त्याचे सामान्यीकरण/समतूल्य करण्याबाबत (Normalization) संबंधित कंपनीकडून देण्यात आलेले सूत्र अधिकृत संकेतस्थळावर माहितीसाठी प्रकाशित करण्यात येईल. सदर (Normalization) गुणांकन पध्दत सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील याची सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

vii. उमेदवारास एका पेक्षा अधिक पदासाठी/संवर्गासाठी अर्ज करावयाचा झाल्यास प्रत्येक पदासाठी / संवर्गासाठी स्वतंत्र अर्ज व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक आहे.

viii. चुकीच्या उत्तरासाठी उमेदवाराच्या प्राप्त गुणांमधुन कोणतेही गुण वजा केले जाणार नाहीत.

ix. अतांत्रिक संवर्गामधील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व तांत्रिक संवर्गातील वाहन चालक पदासाठी एकूण १२० गुणांची (एकूण६० प्रश्न) परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. परीक्षेचा कालावधी एकूण १ तास (६० मिनिट) असेल. ज्यामध्ये ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) असतील व व्यावसायिक चाचणी करीता ८० गुण ठेवण्यात आलेले आहेत. प्रश्नपत्रिकेत खालीलप्रमाणे चार विभाग असतील.

**विभाग १ ते विभाग ४:-**

विभाग १ - मराठीच्या ज्ञानाचे १५ MCQ असतील.
विभाग २ - इंग्रजीच्या ज्ञानाचे १५ MCQ असतील.
विभाग ३ - सामान्य ज्ञानाचे १५ MCQ असतील.
विभाग ४ - तर्क आणि अभियोग्यता चाचणीचे १५ MCQ असतील.

x. तांत्रिक संवर्गातील उर्वरीत सर्व पदनामांकरीता परीक्षेचा कालावधी एकूण १ ½ तास (९० मिनिटे) असेल. ज्यामध्ये १०० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) असतील. प्रश्नपत्रिकेत खालीलप्रमाणे चार विभाग असतील.
विभाग १ - मराठीच्या ज्ञानाचे १५ MCQ असतील.
विभाग २ - इंग्रजीच्या ज्ञानाचे १५ MCQ असतील.
विभाग ३ - सामान्य ज्ञान, तर्क आणि अभियोग्यता चाचणीचे ३० MCQ असतील.
विभाग ४ - (टेक्निकल) विषयाशी संबंधित ४० MCQ असतील.

xi. प्रत्येक प्रश्नाला एकच सर्वोत्तम प्रतिसाद असेल ज्यामध्ये एका प्रमुख उत्तरासह चार पर्याय असतील. प्रत्येक बरोबर उत्तराला दोन गुण दिले जातील.

xii. Introduction of mandatory time-bound sections in MCQ based examinations-reg. MCQ आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य कालमर्यादित ग्रुप

१. **DMER** has decided to introduce mandatory time-bound sections in all its MCQ-based examinations which are conducted on a computer-based platform. This measure has been implemented to enhance the security of the exams in light of emerging threats during the examination process.

१. वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष विभागाने संगणक-आधारित प्लॅटफॉर्मवर आयोजित केलेल्या सर्व MCQ-आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य कालमर्यादित विभाग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर परीक्षेची सुरक्षा वाढवण्यासाठी हा उपाय लागू करण्यात आला आहे.

2. The question paper in these examinations will be divided into multiple time bound groups. **For example**, in **DMER** Exam For (Driver, Higher Grade Stenographer, Lower Grade Stenographer) Post, if there are four time-bound sections (A, B, C & D) in the question paper, each section will have १५ questions and १५ minutes of time allotted. Candidates will be restricted from proceeding to the next section until they complete the allotted time for the previous section. Additionally, candidates will not be allowed to review the questions or modify their responses for a group after the completion of its allotted time. The questions for the next section will start automatically after the completion of the allotted time for the previous section.

२. या परीक्षांमधील प्रश्नपत्रिका विविध कालमर्यादित गटांमध्ये विभागल्या जातील. उदाहरणार्थ, **DMER** (वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष विभागाने) परीक्षेतील प्रश्नपत्रिकेत (वाहनचालक, उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक), चार कालमर्यादित ग्रुप (A, B, C आणि D) असल्यास, प्रत्येक ग्रुपमध्ये १५ प्रश्न असतील आणि १५ मिनिटांचा वेळ दिला जाईल. आधीच्या ग्रुपसाठी दिलेला वेळ पूर्ण केल्याशिवाय उमेदवारांना पुढील विभागात जाता येणार नाही. याव्यतिरिक्त, उमेदवारांना दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर त्या गटातील प्रश्नांचे पुर्नवलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. आधीच्या विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर पुढील विभागातील प्रश्न आपोआप सुरू होतील.

3. Candidates are given the option to mark any question, whether attempted or not, for review. This means that candidates can go through these marked questions in a section again before the allotted time for that section ends. It is important to note that questions marked for review will be evaluated.

३. उमेदवारांनी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला असो वा नसो असा कोणताही प्रश्न पुनरावलोकनासाठी चिन्हांकित करण्याचा पर्याय दिला जातो. याचा अर्थ असा की उमेदवारांनी चिन्हांकित केलेले प्रश्न हे त्या विभागासाठी दिलेली वेळ संपण्यापूर्वी उमेदवार पुन्हा पाहू शकतात. पुनरावलोकनासाठी चिन्हांकित केलेल्या प्रश्नांचे मूल्यांकन केले जाईल हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

१. **व्यावसायिक चाचणी आवश्यक असलेली पदे** : (वाहनचालक/उच्चश्रेणी लघुलेखक/ निम्नश्रेणी लघुलेखक) (For post: Driver/Higher Grade Stenographer/Lower Grade Stenographer)

| Pattern of Examination and related instructions / परीक्षेचे स्वरूप व संबंधित सूचना | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Subject Name / विषयाचे नाव | Group Name | | | |
| | | Group A | Group B | Group C | Group D |
| १ | Marathi language & Grammar / मराठी भाषा आणि व्याकरण (१५ प्रश्न) | 4 Questions | 4 Questions | 4 Questions | 3 Questions |
| २ | English language & Grammar / इंग्रजी भाषा आणि व्याकरण (१५ प्रश्न) | 3 Questions | 4 Questions | 4 Questions | 4 Questions |
| ३ | General knowledge / सामान्यज्ञान (१५ प्रश्न) | 4 Questions | 4 Questions | 3 Questions | 4 Questions |
| ४ | Logical Ability / तार्किक क्षमता (१५ प्रश्न) | 4 Questions | 3 Questions | 4 Questions | 4 Questions |
| Number of Questions / प्रश्नांची संख्या **Total 60 Questions** | | **15 Questions** | **15 Questions** | **15 Questions** | **15 Questions** |
| **Group Wise Timing / विभागानुसार वेळ - Total 60 Minutes** | | **15 Minutes** | **15 Minutes** | **15 Minutes** | **15 Minutes** |

२. **व्यावसायिक चाचणी आवश्यक नसलेली पदे** : उर्वरित १४ तांत्रिक संवर्ग (For Remaining १४ Technical cadre)

| Pattern of Examination and related instructions / परीक्षेचे स्वरूप व संबंधित सूचना | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Subject Name / विषयाचे नाव | Group Name | | | | |
| | | Group A | Group B | Group C | Group D | Group E |
| १ | Marathi language & Grammar / मराठी भाषा आणि व्याकरण (१५ प्रश्न) | 3 Questions | 3 Questions | 3 Questions | 3 Questions | 3 Questions |
| २ | English language & Grammar / इंग्रजी भाषा आणि व्याकरण (१५ प्रश्न) | 3 Questions | 3 Questions | 3 Questions | 3 Questions | 3 Questions |
| ३ | General knowledge/ सामान्यज्ञान & Logical Ability / तार्किक क्षमता (३० प्रश्न) | 6 Questions | 6 Questions | 6 Questions | 6 Questions | 6 Questions |
| ४ | Technical Domain Knowledge / तांत्रिक क्षेत्रातील ज्ञान (४० प्रश्न) | 8 Questions | 8 Questions | 8 Questions | 8 Questions | 8 Questions |
| Number of Questions / प्रश्नांची संख्या – **Total 100 Questions** | | **20 Questions** | **20 Questions** | **20 Questions** | **20 Questions** | **20 Questions** |
| Group Wise Timing / ग्रुपनुसार वेळ – **Total 90 Minutes** | | **18 Minutes** | **18 Minutes** | **18 Minutes** | **18 Minutes** | **18 Minutes** |

५. परीक्षेचे शुल्क

| अ.क्र | प्रवर्ग | शुल्क (रु.) |
|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | रु.१०००/- |
| २ | मागासवर्गीय प्रवर्ग | रु.९००/- (१० % सुट) |
| **परीक्षा शुल्क ना परतावा (Non Refundable) आहे.** | | |

**६. सरळसेवा भरती प्रक्रियेच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

i. प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता केवळ नमूद अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीनेच भरलेला अर्ज व ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येईल. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज/ परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाही. विहीत पध्दतीने, मुदतीत म्हणजेच दिनांक ०९.०७.२०२५ रोजी २३.५५ वाजेपर्यंत अर्ज व शुल्क सादर केलेल्या उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन संगणक आधारित परिक्षेकरीता विचारात घेण्यात येतील. विहीत मुदतीनंतर अर्ज व शुल्क सादर करण्याबाबतची लिंक बंद करण्यात येईल.

ii. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज/ ऑनलाईन शुल्क भरण्यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या सविस्तर जाहिरातीचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आपण ज्या पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहोत किंवा कसे याबाबतची खात्री करावी. तद्नंतरच अर्ज व परीक्षा शुल्क भरावे. सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील व कोणत्याही कारणास्तव ते उमेदवारास परत करण्यात येणार नाही. ऑनलाईन शुल्क भरतांना उमेदवारास परीक्षा शुल्का व्यतिरिक्त संबंधीत बँकेचे नियमानुसार शुल्क/चार्जेस भरावे लागतील. खुल्या प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारास खुल्या प्रवर्गासाठी निश्चित केलेले रु.१०००/- एवढे परीक्षा शुल्क भरावे लागेल. तसेच ऑनलाईन शुल्क भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींना आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष हे जबाबदार राहणार नाहीत.

iii. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अधिवास, जात, उन्नत प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, प्रकल्पग्रस्त, भुंकपग्रस्त, माजी सैनिक, अनाथ, दिव्यांग व इतर बाबी सिध्द करणे ही सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. यापैकी संबंधीत उमेदवारास लागु असलेली ऑनलाईन अर्जात नमुद केलेली कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास अशा उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या/शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखून ठेवले आहेत.

iv. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेले ईमेल आयडी किंवा मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास, मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवारांना ईमेल/एसएमएस व्दारे पाठविण्यात येणाऱ्या सूचना/संदेश/माहिती संबंधित उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ईमेल व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष हे जबाबदार राहणार नाहीत.

v. उक्त नमुद पदांच्या सरळसेवा भरती प्रक्रियेबाबतच्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच ऑनलाईन अर्ज सादर करावा. उमदेवारांचे अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने उमेदवारांनी त्यांचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक, सत्य व अचूक माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रूटी राहील्याने भरती प्रक्रियेच्या/शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यांवर त्यांचा अर्ज /निवड नाकारली गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी

संबधित उमेदवाराची राहील. ऑनलाईन अर्जात नमुद केलेली माहिती भरती प्रक्रियेच्या/शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर बदलता येणार नाही व त्याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

vi. वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाची सदर जाहिरात, विविध माध्यमाव्दारे प्रसारीत केलेल्या सूचना, अटी व शर्तीचा भंग करणारे अथवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने कोणताही गैरप्रकार करणारे, नियमांचे उल्लंघन करणारे, तोतयागिरी करणारे उमेदवार संपूर्ण भरतीप्रक्रियेतून अथवा भविष्यातील सर्व भरती प्रक्रियेसाठी प्रतिरोधित (Debarred) किंवा अपात्र करण्याचे, शासकीय सेवा कोणत्याही टप्प्यावर समाप्त करण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखून ठेवले आहेत.

vii. उमेदवाराने जाणीवपूर्वक अथवा हेतूपूरस्पर चूकीची/खोटी/नजरचुकीने माहिती अथवा चूकीचे कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केल्यास अथवा खरी माहिती लपवली आहे/गैरप्रकाराव्दारे नियुक्ती मिळवली आहे असे भरती प्रक्रियेच्या/ शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवाराची झालेली निवड/शासकीय सेवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखून ठेवले आहेत. तसेच भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरती प्रक्रियेच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास/राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे उमेदवार भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरण्यास पात्र राहतील. तसेच नियमाप्रमाणे दंडास पात्र राहतील

viii. उमेदवारास लेखी परीक्षेची संधी ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार/माहितीनुसार देण्यात येत आहे. परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. निवड यादीत समावेश करण्यात आलेल्या उमेदवारांची सदर सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीबाबत सर्व मुळ कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. कागदपत्र पडताळणीच्या वेळी सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अटी व शर्तीनुसार/ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीनुसार विहीत कागदत्रांची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या/शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्याचे/निवड रद्द करण्याचे/नियुक्ती रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखून ठेवले आहेत.

ix. उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षणाशी संबंधित कागदपत्रे व सदर जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तींच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या पावत्या/पोहोच विचारात घेतल्या जाणार नाहीत. छाननीअंती उमेदवारांने ऑनलाईन अर्जात सादर केलेली माहिती व प्रत्यक्ष सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यास/माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास संबधीत उमेदवारास निवडीकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

x. उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली प्रत्यक्ष माहिती/कागदपत्रे यामध्ये तफावत/विसंगती आढळून आल्यास/खोटी/बनावट असल्याचे आढळून आल्यास भरती प्रक्रियेच्या/ शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. तसेच उमेदवाराने मागणी केलेले सामाजिक किंवा समांतर आरक्षण या सारख्या अन्य सर्व सवलती नामंजूर करण्यात येतील. या संदर्भात उमेदवारास कोणताही दावा/हक्क सांगता येणार नाही.

xi. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत मुदतीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, सरळसेवा भरती प्रक्रियेची रुपरेषा/वेळापत्रक/परीक्षा केंद्र/बैठक क्रमांक/प्रवेशपत्र इत्यादीबाबतची माहिती संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उपरोक्त नमूद संकेतस्थळास भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

xii. ज्या उमेदवारांना सामजिक व समांतर आरक्षणाचे लाभ घ्यावयाचे आहेत अशा उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात मागणी केली नसल्यास सदर मागणीचा विचार केला जाणार नाही.

xiii. उमेदवारांनी त्यांचे नावात काही बदल केला असल्यास त्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे/शासन अधिसूचना (गॅझेट) सादर करणे आवश्यक राहील.

xiv. उमेदवारांनी पत्र व्यवहारासाठी स्वत: चा पत्ता स्पष्ट नमूद करावा व तोच ग्राह्य धरण्यात येईल.

xv. ज्या उमेदवारांचा समावेश समांतर आरक्षणात ंर्गत निवड यादीत करण्यात येईल, अशा पात्रताधारक उमेदवारांची समांतर आरक्षणासंदर्भात कागदपत्रे संबंधित शासकीय विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी करुन घेण्यात येतील. सदर पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

xvi. सदर जाहिराती संदर्भात कोणतेही आक्षेप/निवेदन असल्यास त्याबाबतचे लेखी निवेदन आवश्यक त्या कागदपत्रांसह/पुराव्यासह सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, ४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, पी.डी.मेलो रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या पत्यावर सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप/निवेदन विचारात घेतले जाणार नाहीत.

xvii. उक्त भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरलेल्या उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

xviii. उमेदवारांनी प्राधान्य क्रमाने तीन परीक्षा केंद्राची नावे ऑनलाईन अर्जात नमूद करावीत. त्यानुसार उमेदवारास त्यांनी नोंदविलेल्या तीन परीक्षा केंद्रापैकी एक परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तथापि, ऑनलाईन अर्जात नमूद परीक्षा केंद्रासाठी आवश्यक असलेल्या किमान उमेदवारांची नोंदणी न झाल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रशासकीय अथवा इतर कोणत्याही कारणास्तव सदर परीक्षा केंद्रावर परीक्षा घेता येणार नसल्यास सदर उमेदवारांना उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी वर्ग करण्यात येईल. उमेदवारास कोणते परीक्षा केंद्र दयावे याबाबत तसेच कोणतेही केंद्र बदलण्याचा/वाढविण्याचा अथवा कमी करणे याबाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांचा निर्णय अंतिम राहील. उमेदवाराने निवड केलेल्या केंद्रावर क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांची नोंदणी झाल्या कारणामुळेही उमेदवारास इतर परीक्षा केंद्रावर वर्ग करण्यात येईल. उमेदवाराने परीक्षा केंद्र/परीक्षेचे स्थळ/तारीख/सत्र बदलण्याची केलेली विनंती मान्य केली जाणार नाही. ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेश पत्रावर परीक्षा केंद्राचा पत्ता, परीक्षेची तारीख, वेळ व इतर माहिती नमुद करण्यात येईल.

xix. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेस स्वखर्चाने व स्वत:च्या जोखीमवर उपस्थित रहावे. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस किंवा हानीस जबाबदार राहाणार नाहीत.

xx. परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी केवळ आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांचे मार्फत देण्यात आलेले वैध प्रवेश पत्र ग्राह्य धरण्यात येणार असल्याने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराने सदर प्रवेश पत्राची स्थळप्रत सोबत बाळगणे अनिवार्य आहे.

xxi. परीक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबधीत विविध प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अर्जदाराने परीक्षेच्या विहीत वेळेपूर्वी किमान १.०० तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

xxii. ऑनलाईन परीक्षेच्या वेळी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी जारी केलेल्या प्रवेश पत्रासह खालीलपैकी एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत उमेदवाराने स्वत: जवळ बाळगणे अनिवार्य आहे. ऑनलाईन परीक्षेच्या वेळी स्वत:ची ओळख पटविण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. उमेदवार स्वत: ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास उमेदवाराच्या ओळखीबाबत शंका उपस्थित झाल्यास उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

| अ.क्र | ओळखपत्राचे विवरण |
|---|---|
| १ | आधारकार्ड |
| २ | पॅन कार्ड |
| ३ | वाहन चालविण्याचा परवाना |
| ४ | मतदार ओळखपत्र |
| ५ | शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कर्मचारी ओळखपत्र |
| ६ | पासपोर्ट |
| टिप- शिधापत्रिका (रेशनकार्ड) व शिकाऊ वाहन चालविण्याचा परवाना हा उमेदवाराची ओळख पटविण्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. | |

xxiii. भरती प्रक्रीयेस विलंब होणे, परीक्षा पूर्णपणे रद्द होणे अथवा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होणे याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत परीक्षा वेळेत पार पाडण्याचे/परीक्षा पुन्हा सुरु करण्याचे/निवड प्रक्रिया पुन्हा राबविण्याबाबतचे/भरतीमध्ये अंशत: अथवा पुर्ण बदल करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखुन ठेवले आहेत.

xxiv. परीक्षा कक्षात गणकयंत्र, आयपॅड मोबाईल/पेजर/ब्ल्युटुथ किंवा इतर कोणत्याही दूरसंचार/ इलेक्ट्रानिक संपर्काची साधने घेवून जाण्यास/सोबत बाळगण्यास परवानगी नाही.

xxv. गुणवत्ताधारक उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिध्द केल्यानंतर कागदपत्र पडताळणीकरीता उपस्थित राहण्याबाबतचे वेळापत्रक अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरचे वेळापत्रक वेळोवेळी अधिकृत संकेतस्थळावर तपासावे. कागदपत्र पडताळणी करीता उमेदवारांची उपस्थिती ही बायोमेट्रीक पध्दतीने घेण्यात येईल. नमूद दिनांकावेळी कागदपत्र पडताळणी करीता उमेदवार उपस्थित न राहिल्यास सदर उमेदवारास गैरहजर समजण्यात येईल. अशा उमेदवारांचा कागदपत्र पडताळणी करीता कोणत्याही परिस्थितीत पुन्हा विचार केला जाणार नाही. अशा उमेदवारांचा निवड प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही व त्यांचा नियुक्तीकरीता विचार केला जाणार नाही.

## ७. सामाजिक व समांतर आरक्षणाशी संबधित अटी व शर्ती :-

उक्त भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, सामाजिक, समांतर, दिव्यांग व इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय/पदनिहाय बदल करण्याचे, सरळसेवा भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे/नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखुन ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांना राहतील. त्याबाबतचा उमेदवारांस कोणताही दावा/हक्क सांगता येणार नाही.

i. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. उमेदवारांस ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले सक्षम प्राधिका-यांकडून प्रदान करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

ii. सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने, आरक्षाचा लाभ घेवू इच्छिणा-या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले सक्षम

प्राधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचा दाखला कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

iii. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागेवर झाली आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांना त्यांचे जात प्रमाणपत्राची वैधता तपासणीच्या अधिन राहून संबंधिताची नियुक्ती देण्यात येईल. तथापि नियुक्ती आदेश प्राप्त झालेल्या उमेदवारांनी त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. ६ महिन्यांच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास अथवा जात पडताळणी समितीने/सक्षम प्राधिका-याने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती/निवड तात्काळ रद्द करण्यात येईल तसेच संबधित उमेदवाराविरोधात आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

iv. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दि.०९/०३/२०२३ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना वगळून उर्वरीत मागास प्रवर्गातील उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या विहीत केलेली अंतिम तारीख ज्या वित्तीय वर्षात येते त्या वित्तीय वर्षातील म्हणजेच सन २०२४-२०२५ चे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रगत गट/ व्यक्तीमध्ये (नॉन क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

v. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-२०१९ /प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/०२/२०१९ व राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.३१/०५/२०२१ मध्ये विहीत केल्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकात मोडत असल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

vi. सामजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४ च्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दि.०५/०७/२०२४ नुसार नमुन्यातील जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअर (उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

vii. विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमदेवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

## ८. उभे आरक्षण/सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण :-

सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक यासाठीचे आरक्षण व सदर आरक्षणाचा लाभ घेण्याकरिता संबंधीत उमेदवाराने सादर करावयाची प्रमाणपत्रे यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षणाचे प्रमाण/टक्केवारी | आवश्यक प्रमाणपत्रे |
|---|---|---|---|
| १) | अनुसचित जाती (अ.जा.) | १३ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) |
| २) | अनुसूचित जमाती (अ.ज.) | ७ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) |
| ३) | विमुक्त जाती - (अ)<br>(वि.जा.-अ) | ३ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ४) | भटक्या जमाती - ब<br>(भ.ज.-ब) | २.५ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ५) | भटक्या जमाती- क<br>(भ.ज.-क) | ३.५ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ६) | भटक्या जमाती- ड<br>(भ.ज.-ड) | २ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ७) | इतर मागास प्रवर्ग (इ.मा.व) | १९ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ८) | विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र.) | २ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ९) | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) | १० % | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र |
| १०) | सामाजिक आणि शैक्षिणिक दृष्ट्या मागास घटक (एसईबीसी) | १० % | वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र |

समांतर आरक्षणा संदर्भातील नियुक्तीबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्र.संकीर्ण १११८/प्र.क्र.४१७/१६-अ, दि.२८/१२/२०१८ व शासन परिपत्रक क्र.राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६अ, दि.२५/०१/२०२४ नुसार कार्यवाही करण्यात येईल. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता (सामाजिक अथवा समांतर अथवा सोयीसवलतीचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबधित कायदा/नियम/आदेशानुसार) विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे. समांतर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवुन संबधित उमेदवाराच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

**९. महिला आरक्षण :-**

i. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/०५/२००१ व त्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार माहिला आरक्षण राहील.

ii. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मविआ-२०२३/प्र.क्र.१२३/का-२, दि.०४/०५/२०२३ नुसार खुला प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवड झालेल्या खुला किंवा मागासवर्गीय महिला उमेदवारास ते उन्नत व प्रगत व्यक्ती/गटात (नॉन क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबतची अट रद्द करण्यात आलेली आहे.

iii. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुला या संवर्गाच्या महिला या समांतर आरक्षणाकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता अर्ज करणाऱ्या महिला उमेदवार वगळून उर्वरीत इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर दावा करु इच्छिणा-या महिला उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या विहीत केलेल्या अंतिम तारीख ज्या वित्तीय वर्षात येते त्या वित्तीय वर्षातील म्हणजेच सन २०२४-२०२५ चे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे उन्नत व प्रगत व्यक्ती/गटात (नॉन क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

iv. निवड झालेल्या महिला उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात येईल व पडताळणीच्या अहवालाच्या आधारे संबंधित उमेदवाराच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

**१०. माजी सैनिक :-**

i. उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांना माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

ii. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड झालेल्या माजी सैनिक /उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी करण्यात येईल व पडताळणीच्या अहवालाच्या आधारे संबंधीत उमेदवाराच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६अ, दिनांक ०२.०९.१९८३ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**अ)** माजी सैनिकासाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदावर प्राधान्यक्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

**आ)** युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एक व्यक्ती त्यानंतरच्या पसंतीक्रमाने १५%

आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्तीस पात्र राहील. तथापिउमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाची शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

iii. माजी सैनिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे.

**११. प्रकल्पग्रस्त :-**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१.०१.१९८० तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि.२७/०८/२००९ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील प्रकल्पग्रस्त असले बाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील (जे प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी अपलोड केले आहे.). निवडसूचीमध्ये समावेश केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्राची संबधीत सक्षम प्राधिका-याकडून पडताळणी करुन घेतली जाईल. पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. प्रकल्पग्रस्त आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधित उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दि.२७/१०/२००९ नुसार प्रकल्पग्रस्ताबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**१२. भुकंपग्रस्त :-**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.भुकंप १००९/३५/१६-अ, दि.२७/०८/२००९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार भुकंपग्रस्त आरक्षण राहील गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भुंकपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील भुकंपग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. (जे प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी अपलोड केले आहे.) निवड सुचीमध्ये समावेश केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र हे संबधीत सक्षम प्राधिका-याकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. भुकंपग्रस्त आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दि.०४/११/२०१६ अन्वये प्रकल्पग्रस्त व्यक्तींना तसेच भूकंपग्रस्तांना शासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**१३. पदवीधर अंशकालीन:-**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. पअंक-१००९/पत्र क्र.२००/२००९/कार्या-१६ अ, दि.२७ ऑक्टोबर, २००९ व क्र.अंशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दि.१९ सप्टेंबर, २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षा पर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांची त्यांच्या

अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. पदवीधर अशंकालीन या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवाराचे पदवीधर अंशकालीन आरक्षणासंबधीची कागदपत्र पडताळणी सक्षम प्राधिकारीकडून करुन घेण्यात येईल. सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त अहवालानुसार संबधीत उमेदवाराच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. पदवीधर अंशकालीन आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधित उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पुर्तता करणे अनिवार्य आहे.पदवीधर अंशकालीन या घटकातील जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षीत पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधून दि.१६/०३/१९९९ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात येतील.

**१४. खेळाडू आरक्षण: -**

i. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमाक संकीर्ण-१७१४/प्रकरण क्र ३२५/क्रीयुसे-२ दि.२२/०४/२०१५, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र. क्र.६८/क्रीयूसे-२/दिनांक १ जुलै २०१६ तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक १८/०८/२०१६, शालेय शिक्षण क्रिडा विभाग शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र. क्र.६८/क्रियुसे-२, दि.१० आक्टोबर २०१७, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रंमाक संकीर्ण-१७१६/प्र. क्र.१८/क्रीयुसे-२ दिनांक ३०/०६/२०२२ नुसार व शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

ii. प्रविण्य प्राप्त खेळाजू व्यक्तींसाठी सारक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहीत अर्हता धारण करीता असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे.

iii. खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करिता पात्र ठरतो या विषयाच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज दिनांकापुर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

iv. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडु उमेदवार हा एकाच वेळेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास सर्व खेंळाची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास संबधित उमेदवाराचा खेळाडूकरीता आरक्षित पदावर विचार करण्यात येणार नाही.

v. या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येईल.

**१५. अनाथ आरक्षण :-**

i. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र१८२/का-०३,दि.२३/०८/२०२१ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२ /का-०३, दि.२६/११/२०२१, शासन निर्णय अनाथ-२०२२/पत्र क्रमांक-१२२/कार्या-०३, दि.०६/०४/ २०२३ व सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.१० मे, २०२३ नुसार अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी

दिव्यांग आरक्षणाच्या धर्तीवर करण्यात येईल. तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार अनाथ व्यक्तीचे आरक्षण लागू राहील.

ii. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.अनाथ-२०१८/पत्र क्र.१८२/कपार्या-३/दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ तसेच दि.०६ एप्रिल, २०२३ अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणा-या उमेदवारांनी अर्ज सादर करते वेळी महिला व बाल विकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणेकडून वितरीत करण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

iii. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/पत्र क्रमांक-१२२/कार्या-०३, दि.०६ एप्रिल, २०२३ मधील तरतुदीनुसार अनाथ आरक्षणसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनूसूचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेले शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, किमान गुणवत्ता पात्रता आणि वयोमर्यादा इत्यादी निकष लागु राहतील.

iv. अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणा-या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास विभाग पुणे यांचे कडून अनाथ प्रमाणपत्र याबाबतची पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/विभाग प्रमुख यांची राहील.

v. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्ते नुसार निवड झालेले उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्याच प्रवर्गातून करण्यात येईल.

vi. ऑनलाईन अर्जाव्दारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांचे सद्यस्थितीत उपलब्ध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच दि.२३/०८/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल. अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. अनाथ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधित उमेदवाराने सदर आरक्षासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे.

## १६. दिव्यांग आरक्षण व मार्गदर्शक सूचना

i. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र ११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

ii. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी असतील.

iii. दिव्यांग व्यक्तीची संबधित संवर्ग पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधित उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे.

iv. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवाराचा सामाजिक प्रवर्ग विचारत न घेता दिव्यांग गुणवत्ता क्रंमाकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्ते नुसार निवड झालेले उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्याच प्रवर्गातून करण्यात येईल.

v. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. दिव्यांग-२०२१/प्र. क्र.५४/दि.क.२, दि.१३/०९/२०२२ अन्वये उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४० टक्के (कायमस्वरुपी) दिव्यांगाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

vi. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सर्वाजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रकि-२०१८/प्र. क्र.४६/आरोग्य-६/दिनांक १४/०९/२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नविन/अद्यावत नमून्यातील दिव्यांगत्वाचे नविन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

vii. शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दि.२७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये/भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या/येणा-या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तीना दिव्यांगत्वाच्या सवलती/योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवारांनी अर्ज करतांना शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक दिव्यांग २०२४/ प्रक्र८६/दि.क.२, दि.२७ जून, २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे. त्यातील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

viii. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दि.०५/१०/२०२१ मधील तरतुदीनुसार लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या १. अधंत्व २. शारीरिक दिव्यांगत्वा (दोन्ही बाधीत/नसलेले) ३. मेंदुचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग परीक्षार्थींना लेखनिक/वाचक यांची सुविधा घेण्यास पात्र राहतील. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या इतर प्रकारातील दिव्यांग परीक्षार्थींच्या बाबतीत, संबधित दिव्यांग व्यक्तीने लेखनिक/वाचक पुरविणे आवश्यक असल्याचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले उक्त नमुद शासन निर्णयात नमुद Appendix-I प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक राहील.

ix. उक्त नमुद दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांनी लेखनिकाची व्यवस्था स्वत: करावयाची आहे. संबंधित लेखनिक/वाचक यांची शैक्षणिक पात्रता ज्या पदाकरीत अर्ज केलेला आहे अशा पदाकरीता घेण्यात येणा-या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेवाराने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दि.०५/१०/२०२१ मध्ये नमुद विहीत नमुन्यात Appendix-II लेखनिक/वाचक याची माहिती परीक्षेच्या वेळी समवेक्षक/केंद्र प्रमुख यांना सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या लेखनिक/वाचकालाच प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी परीक्षाकक्षात सोबत ठेवण्यास परावानगी देण्यात येईल. ऐनवेळी लेखनिक/वाचक बदलण्याची परवानगी कोणत्याही परिस्थितीत देण्यात येणार नाही, व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील याची नोंद घ्यावी.

x. लेखनिकाची मागणी करणा-या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी संबधित परीक्षा केंद्राचे केंद्र प्रमुख/समवेक्षक यांचेकडे दिव्यांगत्व संबधीतचे मुळ प्रमाणपत्रे पडताळणीकरीता सादर करणे आवश्यक आहे. तसेच लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे विहीत नमुण्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच लेखनिकाने परीक्षाकेंद्रावर स्वत: ओळख पटविण्यासाठी सदर जाहिरातीमधील सरळसेवा भरती प्रक्रियेच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती मधील अट क्र. (xxii) मध्ये नमुद कोणतेही एक मुळ ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे.

xi. लेखनिकाबाबतच्या सविस्तर सुचना व उक्त नमूद Appendix-I, Appendix-II व नमुना १ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

xii. अनुग्रह कालावधी-लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेच्या निर्धारीत वेळेपेक्षा ४५ मिनीटे भरपाई वेळ देण्यात येईल.

xiii. दिव्यांग उमेदवाराने त्यांना लेखनिकाची आवश्यकता असल्याबाबत ऑनलाईन अर्जात तसे स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे. ऐनवेळेस कोणत्याही दिव्यांग उमेदवारास लेखनिक उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

xiv. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण १०२१/ प्र.क्र.५७/२१/वैसेवा-१, दि.१७ जून, २०२१ व शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र : MEDD-१७०२६/१८/२०२५-MMD (Vais-1) नुसार दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ नुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या आस्थापनेवरील गट-क या संवर्गाचे पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहे.

**१७. नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती: -**

i. उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदीनुसार ते लहान कुटुंबाच्या व्याखेची पुर्तता करतात याबाबतचे प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

ii. उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर संबधीत उमेदवाराने मराठी व हिंदी भाषा परीक्षा संदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमानुसार विहीत मुदतीत दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे आवश्यक राहील.

iii. शासकीय सेवेत नियुक्त केलेल्या उमेदवारास त्याच्या पदाशी संबधीत सेवाप्रवेश नियमातील सर्व नियमांची पुर्तता करणे बंधनकारक राहील. तसेच त्यांना सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

iv. उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

v. ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड सामाजिक आरक्षणा अंतर्गत झालेली आहे. अशा उमेदवारांनी त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

vi. संबधित उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर विहीत मुदतीत चारित्र्य पडताळणी दाखला व शारिरीक पात्रता दाखला संबधित सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. चारित्र पडताळणी अहवाल किंवा शारिरीक पात्रता अहवाल प्रतिकूल असल्यास संबधीत उमेदवार त्यांची नियुक्ती/शासकीय सेवा समाप्त करण्यास पात्र राहतील.

vii. नियुक्ती उमेदवारास राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना/एकिकृत निवृत्ती वेतन योजना व त्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा/तरतुदी लागू राहतील.

viii. नियुक्ती केलेल्या उमेदवारास शासनाने/ नियुक्ती प्राधिका-याने/कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी सोपविलेले सर्व शासकीय कामकाज विहीत वेळेत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

## १८.पदांचे सामाजिक व समांतर आरक्षण निहाय विवरणपत्र

संवर्गाचे नाव :- ०१) **ग्रंथपाल** **एकूण पदे ५** **वेतनस्तर एस-१४ : ३८६०० - १२२८००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **०** | **०** | **५** |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ४ |
| महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजीसैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **०** | **०** | **५** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | निरंक | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ०२) **आहारतज्ञ** **एकूण पदे १८** **वेतनस्तर एस-१४ : ३८६०० -१२२८००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **२** | **२** | **१** | **०** | **१** | **१** | **०** | **४** | **२** | **२** | **३** | **१८** |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | १ | १ | ० | १ | १ | १ | १ | ९ |
| महिला ३०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजीसैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| एकुण | **२** | **२** | **१** | **०** | **१** | **१** | **०** | **४** | **२** | **२** | **३** | **१८** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगसाठी राखीव (अनुषेश ) **अ)** १ पद B/LV<br>B - Blind LV - Low Vision | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ०३) **समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय)** **एकूण पदे १३५** **वेतनस्तर एस-१४ : ३८६०० - १२२८००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.द्.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **१६** | **१०** | **५** | **४** | **४** | **२** | **३** | **२७** | **१४** | **१५** | **३५** | **१३५** |
| सर्वसाधारण | ५ | ३ | २ | १ | १ | १ | १ | ९ | ५ | ५ | १२ | ४५ |
| महिला ३०% | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | ४ | १० | ३९ |
| खेळाडु ५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ७ |
| माजीसैनिक १५% | २ | १ | १ | १ | १ | ० | १ | ४ | २ | २ | ५ | २० |
| प्रकल्पग्रस्त ५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ७ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| पदवीधर अंशकालीन १०% | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ३ | १ | २ | ३ | ५ |
| एकुण | **१६** | **१०** | **५** | **४** | **४** | **२** | **३** | **२७** | **१४** | **१५** | **३५** | **१३५** |
| अनाथ १% | एकुण १ पदे त्यापैकी १ संस्थात्मक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण ०५ पदे दिव्यांगासाठी राखीव **अ)** ०१ पद LV, **ब)** ०१ पद D/HH, **क)** ०१ पद OA/ BA/ OL/ BL/ OAL/ CP/ LC/ Dw/ AAV/ MDy, ड) ०१ पद ASD (M),ID,SLD,MI किंवा MD involving (अ) ते (ड)<br>LV- Low Vision, D- Deaf , HH- Hard Hearing, OA- One Arm, BA - Both Leg, OL - One Leg, BL - Both Leg, OAL - One Arm and One Leg, CP - Cerebral Palsy, LC - Leprosy Cured, Dw -Dwarfism, AAV - Acid Attack Victim, MDy - Muscular Dystrophy, SLD- Special Learing Disability, ID - Intellectual Disability SLD - Special Learning Disability MI- Mental Illness MD - Multiple Disability | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ४) **भौतिकोपचार तज्ञ** **एकूण पदे १७** **वेतनस्तर एस-१४ : ३८६०० - १२२८००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.द्.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **०** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **४** | **२** | **२** | **७** | **१७** |
| सर्वसाधारण | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ७ |
| महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ५ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| माजीसैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| एकुण | **०** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **४** | **२** | **२** | **७** | **१७** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगासाठी राखीव **ब)** ०१ पद D/HH<br>D - Deaf HH - Hard Hearing | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ५) प्रयोगशाळा तंत्रज्ञ एकूण १८१ वेतनस्तर एस-१३ : ३५४०० – ११२४००

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | २७ | ९ | ३ | ३ | ७ | ३ | ३ | ३८ | १८ | १८ | ५२ | १८१ |
| सर्वसाधारण | ९ | ४ | १ | १ | २ | १ | १ | १२ | ६ | ६ | १७ | ६० |
| महिला ३०% | ८ | ३ | १ | १ | २ | १ | १ | ११ | ५ | ५ | १५ | ५३ |
| खेळाडु ५% | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | ९ |
| माजीसैनिक १५% | ४ | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ३ | ८ | ३० |
| प्रकल्पग्रस्त ५% | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | ९ |
| भुकंपग्रस्त २% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| पदवीधर अंशकालीन १०% | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ | २ | २ | ५ | १७ |
| एकुण | २७ | ९ | ३ | ३ | ७ | ३ | ३ | ३८ | १८ | १८ | ५२ | १८१ |
| अनाथ १% | एकूण २ त्यापैकी १ संस्थात्मक १ संस्थाबाहय | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण ०७ पदे दिव्यांगसाठी राखीव **ब)** ०३ पदे D/HH, **क)** ०२ पदे OA/OL/BL/OAL/LC/Dw, AAV , **ड)** ०२ पदे ID, SLD, MI **इ)** MD involving ब ते ड<br>D – Deaf, HH – Hard, OA – One Arm, OL- One Leg, OAL- One Arm and One Leg, LC – Leprosy Cured Dw – Dwarfism, AAV – Acid attack Victim, ID – Intellectual Disability , SLD – Special Learning Disability, MI – Mental Illness , MD – Multiple Disabilities | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ०६) ई.सी.जी. तंत्रज्ञ एकूण पदे ८४ वेतनस्तर एस-१३ : ३५४०० – ११२४००

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | १० | ५ | ३ | २ | २ | २ | ३ | १६ | ८ | १० | २३ | ८४ |
| सर्वसाधारण | ३ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | ९ | ३० |
| महिला ३०% | ३ | १ | १ | १ | १ | १ | १ | ५ | २ | ३ | ७ | २६ |
| खेळाडु ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| माजीसैनिक १५% | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | २ | १ | १ | ३ | ११ |
| प्रकल्पग्रस्त ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | ४ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| एकुण | १० | ५ | ३ | २ | २ | २ | ३ | १६ | ८ | १० | २३ | ८४ |
| अनाथ १% | एकूण पद १ १ संस्थात्मक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०३ पदे दिव्यांगसाठी राखीव, **अ)** १ पद LV, **ब)** १ पद D HH, **क)** १ पद OA, OL, OAL, CP, LC.Dw, AVV<br>LV – Low Vision, D – Deaf, HH – Hard, OA – One Arm, OAL- One Arm and One Leg, OL- One Leg, LC – Leprosy Cured, CP – Cerebral Palsy Dw – Dwarfism, AAV – Acid attack Victim, | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ७) **क्ष-किरण तंत्रज्ञ** **एकुण पदे ९४** **वेतनस्तर एस-१३ : ३५४०० - ११२४००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **८** | **५** | **१** | **४** | **५** | **०** | **३** | **२३** | **९** | **९** | **२७** | **९४** |
| सर्वसाधारण | ३ | २ | १ | १ | २ | ० | १ | ८ | ३ | ३ | ९ | ३३ |
| महिला ३०% | २ | १ | ० | १ | १ | ० | १ | ७ | २ | २ | ८ | २५ |
| खेळाडु ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| माजीसैनिक १५% | १ | १ | ० | १ | १ | ० | १ | ३ | १ | १ | ४ | १४ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ४ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| पदवीधर अंशकालीन १०% | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | ११ |
| एकुण | **८** | **५** | **१** | **४** | **५** | **०** | **३** | **२३** | **९** | **९** | **२७** | **९४** |
| अनाथ १% | एकूण १ पद १ पद संस्थात्मक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण **४** पदे दिव्यांगसाठी राखीव<br>**अ)** १ पद LV **ब)** १ पद D,HH **क)** १ पद OL,LC, DW, AAV **ड)** १ पद ASD (M) ,SLD,MI किंवा MD Involving (अ) ते (ड) | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ०८) **औषधनिर्माता** **एकूण पदे २०७** **वेतनस्तर एस-१० - २९२०० - ९२३००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **२६** | **१५** | **४** | **६** | **७** | **३** | **४** | **४३** | **२१** | **१९** | **५९** | **२०७** |
| सर्वसाधारण | ८ | ५ | १ | २ | २ | १ | १ | १५ | ८ | ६ | १९ | ६८ |
| महिला ३०% | ८ | ५ | १ | २ | २ | १ | १ | १३ | ६ | ६ | १८ | ६३ |
| खेळाडु ५% | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | १० |
| माजीसैनिक १५% | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ३ | ९ | ३२ |
| प्रकल्पग्रस्त ५% | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | १० |
| भुकंपग्रस्त २% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| पदवीधर अंशकालीन १०% | ३ | १ | १ | १ | ० | ० | १ | ४ | २ | २ | ६ | २१ |
| एकुण | **२६** | **१५** | **४** | **६** | **७** | **३** | **४** | **४३** | **२१** | **१९** | ५९ | २०७ |
| अनाथ १% | एकूण **२** त्यापैकी १ संस्थात्मक १ संस्थाबाहय | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०८ पदे दिव्यांगसाठी राखीव **ब)** ०३ पदे D/ HH, **क)** ०३ पदे OL/ BL/ CP/ LC/ Dw/ AAV, **ड)** ०२ पदे ASD (M)/ SLD/ MI, किंवा **इ)** MD involving ब ते ड<br>**D- Deaf, HH- Hard Hearing, OL- One Leg, BL- Both Leg, CP- Cerebral Palsy, LC - Leprosy Cured, DW - Dwarfism, AAV - Acid Attack Victim, ASD - Autism Spectrums Disorder (M-Mild, MoD - Moderate, SLD - Special Learning Disability, MI - Mental Illness, MD - Multiple Disabilities,** | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ९) **दंत तंत्रज्ञ** **एकूण ०९** **वेतनस्तर एस-१० २९२०० - ९२३००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **१** | **१** | **१** | **०** | **५** | **९** |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | १ | ० | २ | ६ |
| महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजीसैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **१** | **१** | **१** | **०** | **५** | **९** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | निरंक | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव: - १०) **सहायक ग्रंथपाल** **एकूण १७** **वेतनस्तर एस-१० २९२०० - ९२३००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **५** | **२** | **१** | **४** | **१७** |
| सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | २ | १ | १ | १ | ८ |
| महिला ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | ४ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजीसैनिक १५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| एकुण | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **५** | **२** | **१** | **४** | **१७** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगासाठी राखीव अ) ०१ पद LV<br>LV - Low Vision | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- ११) **प्रयोगशाळा सहायक** **एकूण-१७०** **वेतनस्तर एस-७ २१७००- ६९१००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **२२** | **१४** | **२** | **४** | **४** | **३** | **४** | **२५** | **१७** | **१९** | **५६** | **१७०** |
| सर्वसाधारण | ७ | ५ | १ | १ | १ | १ | १ | ७ | ६ | ६ | १८ | ५८ |
| महिला ३०% | ७ | ४ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ५ | ६ | १७ | ४८ |
| खेळाडु ५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ३ | ८ |
| माजीसैनिक १५% | ३ | २ | ० | १ | १ | १ | १ | ४ | २ | ३ | ८ | २६ |
| प्रकल्पग्रस्त ५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ३ | ८ |
| भुकंपग्रस्त २% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| पदवीधर अंशकालीन १०% | २ | १ | ० | १ | १ | ० | १ | ३ | २ | २ | ६ | १९ |
| एकुण | **२२** | **१४** | **२** | **४** | **४** | **३** | **४** | **२५** | **१७** | **१९** | **५६** | **१७०** |
| अनाथ १% | एकूण २ त्यापैकी १ संस्थात्मक १ संस्थाबाहय | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०७ पदे दिव्यांगसाठी राखीव **अ)** ०२ पदे LV, **ब)** ०२ पदे D/HH, **क)** ०२ पदे OA/OAL/OL/LC/CP, **ड)** ०१ पद ASD (M, MoD) / SLD / MI/ MD<br>LV – Low Vision, D – Deaf, HH – Hard, OA – One Arm, OAL– One Arm and One Leg, OL– One Leg, LC – Leprosy Cured CP – Cerebral Palsy ASD – autism spectrum disorder (M–Mild, MoD – Moderate) | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- १२ ) **क्ष-किरण सहायक** **एकूण पदे ३५** **वेतनस्तर एस-७ २१७००- ६९१००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **४** | **३** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **७** | **४** | **४** | **१०** | **३५** |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | ० | ० | २ | १ | १ | ३ | १२ |
| महिला ३०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ | ९ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| माजीसैनिक १५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ४ |
| एकुण | **४** | **३** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **७** | **४** | **४** | **१०** | **३५** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगासाठी राखीव **अ)** ०१ पद LV<br>LV – Low Vision | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- **१३) डॉक्युमेंटालिस्ट/कॅटलॉगर/प्रलेखाकार/ग्रंथसुचीकार     एकुण पदे ३६     वेतनस्तर एस-०६- १९९०० - ६३२००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **६** | **३** | **१** | **०** | **१** | **०** | **१** | **८** | **४** | **३** | **९** | **३६** |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | ० | १ | ० | १ | ३ | १ | १ | ३ | १४ |
| महिला ३०% | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ९ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| माजीसैनिक १५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | ४ |
| एकुण | **६** | **३** | **१** | **०** | **१** | **०** | **१** | **८** | **४** | **३** | **९** | **३६** |
| **अनाथ १%** | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगसाठी राखीव ०१ पद **अ)** B/LV<br>B - Blind LV - Low Vision | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव:- **१४) ग्रंथालय सहायक     एकुण पदे १३     वेतनस्तर एस-०६ १९९०० - ६३२००**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **२** | **०** | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **२** | **१** | **१** | **५** | **१३** |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | १ | १ | २ | ८ |
| महिला ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजीसैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण | **२** | **०** | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **२** | **१** | **१** | **५** | **१३** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगासाठी राखीव **ब)** ०१ पद B/LV<br>B - Blind LV - Low Vision | | | | | | | | | | | |

संवर्गाचे नाव :- १५) **वाहनचालक** **एकुण पदे ३७** **वेतनस्तर एस-०६ १९९०० - ६३२००**

| वर्ग | अ.जा. | अ.ज | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | **१** | **३** | **१** | **२** | **१** | **१** | **१** | **९** | **४** | **५** | **९** | **३७** |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | १ | २ | ३ | १६ |
| महिला ३०% | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| माजी सैनिक १५% | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ४ |
| एकुण | **१** | **३** | **१** | **२** | **१** | **१** | **१** | **९** | **४** | **५** | **९** | **३७** |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | एकूण०१ पद दिव्यांगासाठी राखीव **क)** ०१ पद OL,LC,DW,AAV<br>OL -One Leg, LC - Leprosy Cured DW - Dwarfism AAV - Acid Attack Victim | | | | | | | | | | | |

**१६) उच्चश्रेणी लघुलेखक (बृहन्मुंबई बाहेरील पदे)** **एकुण पदे-१२** **(वेतन स्तर एस -१६ : ४४९००-१४२४०० )**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दृ.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ३ | २ | २ | २ | १२ |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | २ | १ | १ | १ | ८ |
| महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ४ |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ३ | २ | २ | २ | १२ |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | निरंक | | | | | | | | | | | |

१७) निम्नश्रेणी लघुलेखक (बृहन्मुंबई बाहेरील पदे) एकूण पदे-३७ (वेतन स्तर एस -१५ : ४१८००-१३२३००)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इमाव | एसईबीसी | आ.दु.दुर्बल घटक | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ८ | १ | १ | ० | ० | १ | ० | ६ | ४ | ३ | १३ | ३७ |
| सर्वसाधारण | ४ | १ | १ | ० | ० | १ | ० | २ | २ | २ | ४ | १७ |
| महिला ३०% | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ४ | १० |
| माजी सैनिक १५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ | ५ |
| पदवीधर अंशकालीन १०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| खेळाडु ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | ८ | १ | १ | ० | ० | १ | ० | ६ | ४ | ३ | १३ | ३७ |
| अनाथ १% | निरंक | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | ०१ पद B/LV B-Blind LV-Low Vision | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष
महाराष्ट्र राज्य